# सूचनापत्रक

महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांमध्ये मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ८८(५) आणि (६) व महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील कलम ८६, ८७, ८९ नुसार महाराष्ट्र राजयातील मालवाहतूक परवाना धारकांना गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी एकुण खालील निर्देशिलेल्या उपलब्ध जागांसाठी शिफारस पत्रे द्यावयाची आहेत. त्यासाठी महाराष्ट्रातील इच्छूक परवाना धारकांकडून सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे विहित नमुन्यात दिनांक २६.१२.२०१९ पासून अर्ज मागविण्यात येत आहेत. उपलब्ध जागांच्या (९१७) संख्येच्या अधीन राहून प्रथम येणाऱ्यास प्रथम पसंती (FIRST COME FIRST SERVE) या तत्वाचे पालन करुन प्रतिस्वाक्षरी परवान्यासाठी शिफारसपत्रे दिली जातील.

| प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारस करावयाचे राज्य | प्रतिस्वाक्षरीसाठी कोटा | प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारसपत्राकरिता एकुण उपलब्ध जागा |
|---|---|---|
| गुजरात | ९१७ | ९१७ |

**शिफारस पत्र मिळण्यासाठी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१. प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.

२. अर्ज सादर करताना वाहनाची सर्व वैध कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावी लागतील.

३. अर्जदाराने अर्जासोबत स्वत:चे छायाचित्र असलेल्या ओळखपत्राची छायांकित व साक्षांकित प्रत जोडावी.

४. गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी परिवहन आयुक्त, गुजरात राज्य, सुरत यांच्या कार्यालयात एक वर्षाचा कर रु.५,५००/- इतका आगावू भरावा लागेल.

५. अर्जदाराने संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्याकडून परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावाने गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरी मिळण्याबाबतचे शिफारसपत्र आणावे.

विहित नमुन्याचे अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय व महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून मिळू शकतील. अर्जाचे शुल्क रु.०५/- इतके आहे

पूर्णत: भरलेला अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय, एमटीएनएल बिल्डिंग, फाउंटन-२, ५ वा मजला, महात्मा गांधी रोड, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१. येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत अर्ज शुल्कासह प्रत्यक्ष सादर करावेत. टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विहित नमुन्यातील पूर्ण भरलेल्या आणि निर्देशित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांचाच प्रतिस्वाक्षरीच्या शिफारशीसाठी विचार केला जाईल. अपूर्ण व विनाशुल्क प्राप्त झालेले अर्ज नामंजूर केले जातील.

**सचिव**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**